<u>निशाणी क्रमांक १९</u> | <u>नि.फौ.ख. क्र. ६३६/२०२५</u>

<u>सरकार –वि– सुनिल महादु धनगर</u>

## <u>साक्षीदार क्रमांक ०१ चा शपथेवर पुरावा</u>

**नाव** – योगेश संजय पाटील,
**वय** – ३१ वर्षे, **व्यवसाय** – धंदा,
**राहणार** – सरवड, ता. जि. धुळे

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती प्रभावती माळी यांचेतर्फे</u>**

दिनांक ०३/१२/२०२४ रोजी पोलीसांनी मला सोनगीर फाटयाजवळ पंचनामा कारवाईसाठी बोलाविले होते. त्याठिकाणी एका पीक अप वाहनाने मनोज रविंद्र पाटील यांना धडक देऊन अपघात केला होता. घटनास्थळ हे रविंद्र पाटील यांनी दाखविले होते. घटनास्थळ हे सोनगीर ते दोंडाईच्या रस्त्यावर पेट्रोल पंपाच्या अलीकडे होता. तेथे पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला व त्यावर पंच म्हणुन माझी सही घेतली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर पंच क्रमांक १ म्हणुन माझी सही आहे व पंच क्रमांक २ म्हणुन किशोर सुरेश पाटील यांची देखील सही आहे. पंचनाम्यात लिहिलेला मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्याला निशाणी क्रमांक पी–१/सा.क्र.१ देण्यात येते.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास – आरोपींचे वकील श्री. सी.आर. तेले यांचेतर्फे</u>**

०२. मी रविंद्र पाटील यांना ओळखतो कारण तो माझा चुलत भाऊ आहे. मृतक मनोज रविंद्र पाटील माझा चुलत पुतण्या होता. घटनास्थळी मी किती वाजता पोहचलो ते मला सांगता येणार नाही परंतु तो संध्याकाळची वेळ होती. मला घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येणार नाही. मला घटनास्थळाचा अक्षांस व रेखांक्ष सांगता येणार नाही. मी अपघाताची घटना प्रत्यक्ष पाहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस ठाण्यात पंचनाम्यावर मी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मृतक माझे नातेवाईक असल्यामुळे व रविंद्र देखील माझा नातेवाईक असल्यामुळे रविंद्रच्या सांगणेवरुन मी खोटी साक्ष देतो आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष पंचनामा कारवाई झाली नव्हती. मला पीक अप वाहनाचा क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देतो आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

SHAHZAD PARVEZ ABDUL MUNAF
Digitally signed by SHAHZAD PARVEZ ABDUL MUNAF
Date: 2026.06.04 17:01:16 +0530

(शहेजाद परवेज)

दिनांक : ०४/०६/२०२६

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, धुळे